# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## सूचना

No.NB/ /२०२०-२१ दिनांक : २२.१.२०२१

---

महाविद्यालयातील एन.एस.एस. व एन.सी.सी. च्या विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक बंधू भगिनींना सूचित करण्यात येते की, सोमवार दि. २५.०१.२०२१ रोजी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त सकाळी ९.४५ वाजता महाविद्यालयाच्या ऑफिस समोरील पोर्च मध्ये मतदार प्रतिज्ञेचे सामूहिक वाचनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे.

(प्रा. डी. ए. पवार )
विभाग प्रमुख,राज्यशास्त्र विभाग

( डॉ. आर. आर. कुंभार )
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

# विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर (स्वायत्त )

## राज्यशास्त्र विभाग

## राष्ट्रीय मतदार दिवस

## 25 जानेवारी 2021

## कार्यक्रम पत्रिका

| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक | - | प्रा.समीक्षा फराकटे |
| मनोगत | - | प्रा. दिलीप पवार<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख |
| अध्यक्षीय मनोगत | - | डॉ. आर आर कुंभार<br>प्राचार्य, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर |
| आभार | - | प्रा. आर के भरमगोंडा |

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

वेळ: सकाळी १० वाजता

राष्ट्रीय मतदार दिवस 25/01/2021



मा. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार विचार व्यक्त करताना
प्रा. डी. ए. पवार, प्रा. समिक्षा फराकटे व इतर प्राध्यापक



NAND COLL
ESTD.
JUNE
1964
APUR-41600

मतदार प्रतिज्ञेचे वाचन करण्यासाठी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थीनी

# मतदान करणे हीच खरी देशसेवा

प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

## विवेकानंद मध्ये राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

कोल्हापूर, दि. 25: विवेकानंद कॉलेजमध्ये 25 जानेवारी 2021 हा 11 वा राष्ट्रीय मतदार दिवस मतदार जागृती दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांनी मार्गदर्शन करताना विदयार्थ्यांनी मतदान नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. मतदार नोंदणीशिवाय मतदान करता येत नाही. येणाऱ्या प्रत्येक निवडणूकीत मतदान करुन निवडणूका शांततेच्या वातावरणात पार पाडण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे. आपली लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी मतदान करणे ही सुध्दा देशसेवा आहे. असे विचार मांडले.

त्यानंतर राज्यशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रा डी ए पवार यांनी मार्गदर्शन करताना आपल्या लोकशाहीवर निष्ठा ठेऊन लोकशाही सुदृढ व निकोप बनविण्यासाठी आपण सर्वांनी मिळालेल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर केला पाहिजे. हे कार्य कोणा एकाचे नसून यामध्ये सर्व मतदारांचा सहभाग आवश्यक आहे. मतदारांना अपेक्षित असलेले परिवर्तन करण्यासाठी मतदान करताना जात, धर्म, भाषा यांचा विचार न करता, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता स्वच्छ प्रतिमा व कर्तव्यदक्ष उमेदवाराना निर्भयपणे मतदान केले पाहिजे. आपल्या इच्छा आकांक्षांची पूर्तता करणाऱ्या, लोककल्याण व लोकहित साधणाऱ्या उमेदवारांची प्रतिनिधी म्हणून मतदार त्यांची निवड करतात त्यातून पुढे सरकार अस्तित्वात येते. निवडून दिलेले प्रतिनिधी किंवा सरकार आपले कर्तव्य पार पाडत नसतील, सत्तेचा दुरुपयोग करीत असतील तर येणाऱ्या पुढील निवडणूकीत मतदान अधिकार शस्त्राचा वापर करुन शांततामय व अहिंसात्मक पध्दतीने सत्ता परिवर्तन करता येते. त्यासाठी प्रत्येक निवडणूकीत प्रत्येक मतदारांनी मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे.

यावेळी विदयार्थी, प्राध्यापक , प्रशासकीय कर्मचारी यांनी मतदार प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन करुन मतदान करण्याबाबत प्रतिज्ञा घेतली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा समीक्षा फराकटे यांनी केले तर आभार लेप्टनंट प्रा जे आर भरमगोंडा यांनी मानले. या कार्यक्रमास एन.एस.एस, एन.सी.सी. विदयार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

---

**विवेकानंद कॉलेज (स्वायत), कोल्हापूर**

जा.क्र.व्हीसीके/By Mail/2020-21 — दि. 25 1.2021

प्रति,

मा.संपादकसो,

दैनिक ------------------------

कोल्हापूर

विषय : बातमी प्रसिध्दी बाबत.

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

( डॉ. आर. आर. कुंभार)

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## सूचना

No.NB/893/२०२०-२१

दिनांक : २१.१.२०२१

---

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाने दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी ११ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणेबाबत निर्देशित केलेले आहे. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने निवडणूक व मतदार नोंदणी संदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर यांचेवतीने Online प्रश्नमंजुषा स्पर्धा http://forms.glelexy ४६Bqja४Hp३nez६ या लिंकव्दारे आयोजित केलेली आहे. सदर लिंकव्दारे सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी यामध्ये सहभागी व्हावे .

**(प्रा. डी. ए. पवार )**
विभाग प्रमुख,राज्यशास्त्र विभाग

**( डॉ. आर. आर. कुंभार )**
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR

उप जिल्हाधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
निवडणूक शाखा

फोन नं. 0231-2658316 dydeokolhapur@gmail.com

75

---

निवडणूक/तात्काळ.

जावक क्रं.कार्या-१०/निवडणूक/मतदार नोंदणी/आरआर- 20 /२०२१
दिनांक:- १९ जानेवारी, २०२१.

प्रति,

१. मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. प्राचार्य,
सर्व महाविद्यालय

VIVEKANAND COLLEGE INWARD No. 894 Date- 20.1.2021

**विषय :-दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणेबाबत.....**
**ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजन करणेबाबत......**

संदर्भ:- आयोगाकडील पत्र क्र.ईएलआर-२०२०/प्र.क्र.७१०/२१/३३, दिनांक- १५ जानेवारी, २०२१

महोदय

भारत निवडणूक आयोगाने दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी ११ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने निवडणूक व मतदार नोंदणी संदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर यांचेवतीने Online प्रश्नमंजुषा स्पर्धा **https://forms.gle/८xy४६Bqja४Hp३nez६** या लिंकव्दारे आयोजित केलेली आहे.

सदर स्पर्धेची लिंक सर्व विद्यार्थ्यांना आपल्यामार्फत पाठविणेत यावे व यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी करुन घेणेत यावे हि विनंती.

आपला,

(भगवान कांबळे)
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर.

प्रा. डॉ. ए. पवार
fwd 17/1/2021

20/1/21

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1954 KOLHAPUR-416003